**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांक:- २६/१०/२०१८

# मोटार सायकल चोरीचे रॅकेट उघडकीस - ०५ सराईत गुन्हेगार गजाआड
# स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई - १३ मोटर सायकल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. नीलोत्पल सो.** यांनी जिल्हयातील मोटर सायकल चोरीचे गुन्हयांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन केले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे** यांचे पथकाने मोटर सायकल चोरीचे गुन्हयांचा समांतर तपास सुरू केला. तसेच मोटर सायकल चोरी करणारे गुन्हेगारांची सध्याचे वास्तव्याबाबत माहिती घेवुन वर्दळीचे ठिकाण, बाजारपेठ, बॅंक, हॉस्पिटल, शाळा/कॉलेज व शहरातील मुख्य रस्त्यांवर पाळत ठेवुन मोटर सायकल चोरी केले जाते व सदर चोरीच्या मोटर सायकल हया कमी किंमतीत बनावट नंबर प्लेट तयार करून विक्री केल्या जातात बाबत गोपनीय रित्या सविस्तर माहिती घेतली.

त्यानुसार दिनांक २५/१०/२०१८ रोजी **स्थानिक गुन्हे शाखेचे** पथकातील अधिकारी व कर्मचारी असे मोटर सायकल चोरणारे गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी येवला व मनमाड परिसरात गस्त घालत होते. दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त माहिती नुसार मनमाड शहरातील काही संशयीत हे बनावट नंबर प्लेट लावुन मोटर सायकल वापरत असले बाबत समजले वरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी मनमाड शहरातुन सराईत गुन्हेगार नामे **१) गणेश राजेंद्र खैरणार,** वय २७, रा. निंबाळकर चाळ, मनमाड, ता.नांदगाव, **२) राजु रमेश सपकाळ,** वय २३, रा. विवेकानंदनगर, मनमाड, ता.नांदगाव, **३) अमोल पोपट वाघ,** वय २५, रा.विवेकानंदनगर, मनमाड, ता.नांदगाव यांना शिताफिने ताब्यात घेतले. त्यांचेकब्जातुन एक बनावट नंबरप्लेट असलेली स्प्लेंडर प्लस मोटर सायकल जप्त करण्यात आली, सदर मोटर सायकल बाबत विचारपुस करता त्यांनी ती येवला शहरातुन चोरी केली असल्याची कबुली दिली.

सदर आरोपीतांना विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचे **साथीदार नामे ४) गोरख पुंडलीक कदम,** वय २२, रा. सोमठाण देश, ता.येवला, **५) वाल्मिक भाउसाहेब पिंपरकर,** वय २८, रा. सोमठाण देश, ता.येवला, व ६) रविंद्र उर्फ भैय्या वसंत बेलेकर, रा. विंचुरकरवाडा, विंचुर, ता.निफाड यांचेसह **येवला, मनमाड, लासलगाव, चांदवड, निफाड** परिसरातील वर्दळीचे ठिकाणांवरून मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली आहे. यातील आरोपी गोरख कदम व वाल्मिक पिंपरकर यांना येवला परिसरातुन ताब्यात घेण्यात आले असुन आरोपी रविंद्र उर्फ भैय्या बेलेकर याचा शोध सुरू आहे.

आरोपी गोरख कदम, वाल्मिक पिंपरकर व रविंद्र उर्फ भैय्या बेलेकर हे तिघेजण **नुकतेच नांदगाव पोलीस ठाणेकडील मोटर सायकल चोरीचे गुन्हयात जामीनावर** सुटले होते. त्यानंतर त्यांनी त्यांचे मनमाड येथील वरील साथीदारांसह गॅंग तयार करून पुन्हा मोटर सायकल चोरीचे गुन्हे करण्यास सुरूवात केली. सदर आरोपी हे चोरी केलेल्या मोटर सायकली बनावट नंबरप्लेट व बनावट कागदपत्र तयार करून मिळेल त्या किंमतीत विक्री करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीतांचे कब्जातुन येवला व मनमाड परिसरात विक्रीकरीता लपवुन ठेवलेल्या **०४ हिरो पॅशन प्रो, ०२ हिरो स्प्लेंडर, ०२ बजाज पल्सर, ०१ बजाज सी.टी १००, ०१ बजाज प्लॅटीना, ०१ टी.व्ही.एस.अपाचे, ०१ टि.व्ही.एस.स्टार, ०१ होण्डा शाईन अशा एकुण १३ मोटर सायकल किं.रू. ०४ लाख ५० हजार रूपये** किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वरील आरोपीतांचे कब्जात मिळुन आलेल्या मोटर सायकल बाबत चौकशी करता येवला शहर व लासलगाव पोलीस ठाणेस दाखल असलेले मोटर सायकल चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस आलेले आहे. ताब्यात घेतलेले आरोपीतांना जप्त मुद्देमालासह येवला शहर पोलीस ठाणेस हजर करण्यात आले असुन पुढील तपास चालु आहे. वरील सर्व आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेविरुध्द येवला शहर, लासलगाव, नांदगाव, मनमाड पोलीस ठाणेस **मोटर सायकल चोरी, तसेच जबरी लुटमारीचे गुन्हे दाखल** आहे. सदर गुन्हयांचे समांतर तपासात अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन सदर आरोपींचे इतर साथीदारांचा स्थागुशाचे पथक कसोशिने शोध घेत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**., अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. नीलोत्पल सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री.अशोक करपे**, पोहवा शांताराम घुगे, पोना रावसाहेब कांबळे, भारत कांदळकर, पोकॉ प्रविण काकड, कुणाल मोरे, भाउसाहेब टिळे, इम्रान पटेल, संदिप लगड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, चालक पोकॉ गोकुळ सांगळे, योगेश गुमलाडू यांचे पथकाने वरील आरोपीतांना ताब्यात घेवुन **मोटर सायकल चोरीचे मोठे रॅकेट उघडकीस** आणले आहे.

**<u>नागरीकांना आवाहन :-</u>**

जप्त करण्यात आलेल्या एकुण **१३ मोटर सायकलींचे** नंबर गुन्हेगारांनी बदलले असुन ते बनावट आहे. जप्त करण्यात आलेल्या काही मोटर सायकलचे मुळ मालकांचा शोध लागलेला नाही. ज्या नागरीकांच्या मोटर सायकल चोरीस गेल्या असेल त्यांनी चेसिज नंबर व इंजिन नंबर वरून खात्री करून स्थानिक गुन्हे शाखा कार्यालय फोन नंबर ०२५३-२३०९७१०, तसेच येवला शहर पोलीस ठाणे दुरध्वनी क्र. ०२५५९-२६५०१६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.